# येवला नगरपरिषद येवला, जिल्हा - नाशिक

नगरपरिषद कार्यालय - ०२५५९-२६५०२६ मुख्याधिकारी - २५५९-२६६३६८
अध्यक्ष - ०२५५९-२६५४१६
ई-मेल - coyeola@gmail.com

---

श्री. / श्रीमती. योगेश गायकवाड ( आर्की./इंजि./सुपरवायजर)
रा.येवला जि.नासिक.

विषय:- स.नं. ७६/१८ पै. प्लॉट नं. ८ पै ९ सि.स.नं. ———
चे जागेत बांधकाम परवानगी बाबत.
अर्जदार :-श्री./श्रीमती. हाजि मो. इसाक व इतर मो. इरफान यांचे अ.मु. श्री एम नासर पारख
यांचे दि.२१/१२/२०१६ रोजीचे अर्जानुसार.

आपणांस कळविण्यात येते की, शहरातील वरील विषयांकित कामाचे संदर्भातील आपले मार्फत दाखल परवानगी बाबत खालील प्रमाणे सुचना देणेत येत आहे.

१. सदर प्रकरणी बांधकाम नकाशे आपण दाखल केलेले असुन मंजुर नकाशा प्रमाणे काम करुन घेणेची जबाबदारी तांत्रिक दृष्टया आपणावर बंधनकारक राहिल.
२. सदर प्रकरणी दिलेल्या बांधकाम नकाशानुसार काम न आढळल्यास अथवा भुकंपरोधक नसल्यास अथवा तांत्रिक दृष्टया योग्य न वाटल्यास त्याची आपणावर जबाबदारी निश्चीत करणेत येईल.
३. बांधकाम नकाशा, रस्ता अंतर, रस्त्याची रुंदी, **Rain Water Harwesting** इ. बाबी बांधकाम नियमावली नुसार दर्शविणेची व ते प्रत्यक्षात करुन घेणेची जबाबदारी आपणावर राहिल.
४. बांधकाम परवानगी दिल्यानंतर मंजुर केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकाम करतांना जोत्या पर्यंतच्या बांधकामाचे (**Plinth Complition Cert.**) प्रमाण पत्र घेणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय काम पुर्णत्वाचा भागशः अथवा पुर्ण बांधकामाचा दाखला दिला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
५. बांधकाम नियमावली नुसारचे बांधकामाची उंची असणे आवश्यक आहे. बेसमेंटचे काम होणार नाही याची दक्षता आपणास घ्यावी लागेल.
६. कोणत्याही स्वरुपाचे म्हणजे हवाई अतिक्रमण, जमिनी वरील अतिक्रमण आढळुन आल्यास अतिक्रमण काढण्याची कार्यवाही न.पा.स करावी लागेल त्यावेळी आपले परवाना पत्र रद्द करुन काळया यादित नाव समाविष्ट करणेत येईल.
७. पिण्याच्या पाण्याची टंचाई भासु नये म्हणुन पिण्याच्या पाण्याचे साठवणुकीसाठी टाकी बांधकाम जमीन पातळीवर करुन घेणेची जबाबदारी आपणावर राहिल.

वरील प्रमाणे बांधकाम नियमावली नुसार बांधकाम परवानगी धारका कडुन काम करुन घ्यावे व नगरपालिकेस सहकार्य करावे.

मुख्याधिकारी
येवला नगरपरिषद,येवला

Kasare -५६

# येवले नगरपरिषद, येवले

येवला, ता. येवला. जि. नाशिक

जा.क्र. प.ब.डो. / बशी-बांधकाम - क्र ११५/१६/१७

येवले नगरपालिका कार्यालय,
दिनांक : 31/03/2017

(महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १८९ व महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये बांधकाम परवाना)

प्रति,

~~श्री [illegible]~~
~~श्री [illegible]~~
~~येवला जि नाशिक~~

विषय : येवला. ता. येवला येथील सि.स.नं. —— / स.नं. ७६/१८४.
भुखंड क्रमांक ८ ते ९. मध्ये इमारत बांधकाम परवानगी बाबत...
संदर्भ : आपला दिनांक २९/१२/२०१६ रोजीचा अर्ज.

---

(अ) आपण सादर केलेले बांधकाम नकाशे खालील बाबतीत सदोष आढळले.

१) ज्या भुखंडात बांधकाम परवानगी मागितली आहे त्या क्षेत्राचा अभिन्यास अंतिमरित्या विकास निधी भरुन नगरपालिकेकडुन मंजुर केलेला आढळत नाही.

२) ज्या भुखंडात बांधकाम करावयाचे आहे. सदरचे बांधकाम भुकंप रोधक असल्याचा दाखला दिल्याशिवाय काम पुर्णत्वाचा दाखला देता येणार नाही.

३) मा. सहा. संचालक सो, नगर रचना विभाग, नाशिक यांचे पत्र क्र. ४२३ दि. २४/३/२०१७ नुसार व मा. तहसी, येवला यांना एकत्रित पत्र जा.क्र. कावि-४/४३८/१७ दि. ३१/३/२०१७ नुसार एकत्रीकरण करतेच्या अटीवर सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

वरील कारणास्तव योग्य त्या दुरुस्त्या बांधकाम नकाशात हिरव्या रंगाने दर्शविल्या आहेत.

(ब) आपणांस बांधकाम परवानगी खालील अटींवर देण्यांत येत आहे.

१) सर्वप्रथम ज्या भुखंडात परवानगी मागितली आहे त्या क्षेत्राचा अभिन्यास अंतिमरित्या मंजुर झाल्याशिवाय प्रत्यक्ष जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करणार नाही. अभिन्यास अंतिमरित्या मंजुर करुन घेतल्यानंतरच प्राप्त बांधकाम परवानगीनुसार प्रथम बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजूर नकाशा प्रमाणे आहे असे प्रमाणपत्र नियोजन प्राधिकरणाकडुन घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये.

२) भुखंडाची नकाशावर दर्शविलेल्या प्रमाणे मापे प्रत्यक्ष जागेवर जुळत असली पाहिजेत व समोरुन, मागुन व बाजुने सोडावयाचे समास बांधकामानंतर जागेवर खुले असले पाहिजेत.

३) सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ती कामे नियोजन प्राधिकरणास समाधारनकारक वाटतील अशा प्रकारे केली पाहिजेत.

४) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्ततेचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर सुरु करु नये.

५) दिलेली परवानगी ही फक्त एक वर्षासाठी वैध राहील व या मुदतीत बांधकाम पुर्ण न झाल्यास परवानगीचे नुतनीकरण करुन लागेल. दिलेल्या मुदतीत बांधकाम पुर्ण न झाल्यास बांधकामाची मुदतवाढ परवानगी नंतर दोन वेळेस देण्यात येईल. या मुदतीतही बांधकाम पुर्ण न झाल्यास बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

(मागे पहा ...)

Generated by CamScanner from intsig.com

६) महसुल खात्याकडुन किंवा इतर संबंधित खात्याकडुन आवश्यक ती परवानगी मिळविणे ही सर्वस्वी तुमची जबाबदारी राहील.

७) यासोबत मंजुर केलेली बांधकाम परवानगी सुधारित करुन पुन्हा परवानगी घ्यावयाची असल्यास मंजुर बांधकाम नकाशे सुधारित करण्याची कारणे नमुद करणे आवश्यक आहे.

८) घरांत जाणे-येणे करीता नगरपालिकेचे गटारीवरील ढापा टाकणे आवश्यक असल्यास तो नगरपालिकेच्या ओव्हरसियर सांगतील त्याप्रमाणे व त्या मापाचा रस्त्याचे लेव्हलमध्ये टाकण्यात यावा.

९) सदरचे बांधकाम सि.स. सनदेशी मेळ ठेऊन कोणाचेही हक्कास बाधा येणार नाही अगर नगरपालिका हद्दीत अतिक्रमण होणार नाही असे करावे. सदरचे बांधकाम नगरपालिका अधिनिरत येवले शहर विकास योजनेचे नियमास अनुसरुन करावे.

१०) प्रत्येक खोलीचे वायुविजनाकरीता नियमानुसार पुरेशी सोय करण्यांत यावी.

११) प्रत्येक खोलीचे क्षेत्र नगरपालिका बांधकाम उपविधीचे नियमास अनुसरुन ठेवण्यांत यावे.

१२) बांधकाम झाल्यावर नगरपालिका कार्यालयात कळविण्यांत यावे.

१३) बांधकाम सुरुवात करणेपुर्वी म. नगरभुमापक अधिकारी यांचेकडुन जागेची मोजणी करुन घेऊन त्याचा नकाशा नगरपालिका कार्यालयात हजर करावा व नंतरच बांधकामास सुरुवात करणेत यावी.

१४) घराचे बांधकामासाठी सामान घरासमोरील रस्त्यावर अगर नगरपालिकेच्या जागेवर ठेवणे असल्यास त्याकामी ६५ पैसे कोर्ट फी तिकीट लावुन परवानगी मिळणे बद्दल स्वतंत्र अर्ज करावा व अर्जाप्रमाणे परवानगी मिळाल्यास रस्त्यावर अगर नगरपालिका जागेवर सामान ठेवण्याबद्दल दररोज ५० पैसे प्रति चौरस मिटर प्रमाणे भाडे द्यावे लागेल.

१५) प्रमाणित नगरपालिका बांधकाम उपविधीस अनुसरुन याबाबतची बांधकाम परवानगी तपासणी फी व विकास निधी (Betterment Charges) नगरपालिका कार्यालयात त्वरीत भरणा करावी.

१६) बांधकाम साहित्यात फ्लाय, ॲश, विटा व फ्लाय ॲश आधारित साहित्याचा वापर करावा.

१७) कमीत कमी पाच वृक्षांची लागवड करावी लागेल व त्याची जोपासना करणे बंधनकारक राहील.

१८) बांधकाम करते वेळेस शासनाचे प्राप्त निर्देशानुसार पावसाचे पाणी भरण (Rain Water Harvesting) प्रक्रिया करणे बांधकाम धारकास बंधनकारक राहील.

१९) बांधकाम धारकाने सौर उर्जेचा वापर पाणी तापविणेकरीता करावा.

२०) दैनंदिन पिण्याचा पाण्याचा होणारा पाणीपुरवठा साठवणुकीसाठी हौद बांधणे बंधनकारक राहील.

२१) भु.क्र. ८ ते ९ करिता - सदर इमारत नकाशात नमुद Lift बाबत मा. कार्यकारी अभियंता सो. सार्व. बांधकाम विभाग, नाशिक (यांत्रिकी विभाग) यांचा ना हरकत दाखला प्राप्त झाले नंतरच वापरास खुला करणेत यावा.

वरील सर्व अटीस अधिन राहुन आपणांस सि.स.नं. —— / स.नं. ७६/१८ पै. भुखंड क्रमांक ८ ते ९. चे बांधकाम परवानगी देण्यांत येत आहे. कळावे.

ता. ३१ / 03 / २०१६

क. अभियंता
येवला नगरपरिषद येवला
जि. नाशिक
ओव्हर सियर
येवले नगरपालिका, येवला

मुख्याधिकारी
येवले नगरपालिका, येवला

प्रत : म. नगर भुमापन अधिकारी येवला यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरीता सादर.

Generated by CamScanner from intsig.com